महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.DGP-D-२८-A/४९३७/दिवंगत-लाभ/ ७९/२०२४ मुंबई,दिनांक:-ई- स्वाक्षरीत नमुद

विषय:- नक्षलवादी कारवाईसह अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी, संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई, व आपात्कालीन काळात मदत करताना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी /अंमलदार यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई व इतर सोयी सुविधा देणेबाबत...

****

परिपत्रक:-

नक्षलवादी कारवाईसह अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी, संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई, व आपात्कालीन काळात मदत करताना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई व त्या अनुषंगाने देण्यात येणा-या इतर सोयी सुविधा खालील प्रमाणे आहेत :-

१. **वेतन खाते विमा :-** शासकीय कर्मचारी दिवंगत झाल्यावर त्या दिवंगत कर्मचा-याचे वेतनाचे खाते ज्या बँकेत असते त्या बँकेला संबंधित घटक कार्यालयाने दिवंगताचे वारसास अपघात विमा मंजुर करण्याबाबत पत्राद्वारे कळवावे. सदर पत्राची प्रत दिवंगताचे कुटुंबियांस देऊन त्यांना बँकेतील अपघात विमा संदर्भात संबंधित बँकेशी संपर्क साधणेबाबत कळवावे. सदर कार्यवाही संबंधित घटक कार्यालयाने त्यांचे स्तरावर करावयाची आहे.

२. **राज्य शासकिय कर्मचारी समूह वैयक्तीक अपघात विमा योजना :-** राज्य शासकिय कर्मचा-यांकरीता संपुर्णत: कर्मचा-यांच्या वर्गणीवर आधारित अशी "राज्य शासकिय कर्मचारी समुह वैयक्तीक अपघात विमा योजना " वित्त विभागाच्या दि.०४.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.०४.२०१६ पासुन लागु करण्यात आली आहे. तदनंतर यासंदर्भात झालेल्या शासन निर्णयाचा समावेश शा.नि. वित्त विभाग क्र. २०१९ /प्र.क्र.६४ / विमा प्रशासन, दि. २४.०१.२०२३ मध्ये करण्यात आलेला आहे.

दि. २४.०१.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार राज्य शासकिय कर्मचारी समूह वैयक्तीक अपघात विमा सर्व शासकीय कर्मचारी (वर्ग अ ते ड) यांना लागू आहे. सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनातून दरवर्षी माह फेब्रुवारी मध्ये राज्य शासकिय कर्मचारी समूह वैयक्तीक अपघात विमा योजनेच्या वर्गणीची रक्कम पदनिहाय कपात करण्यात येते. शासकिय कर्मचारी मृत्यू पावल्यास, संबधित घटक कार्यालयाने विमा मंजुरीबाबतचा प्रस्ताव विमा संचालनालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे सादर करावा. सदर कार्यवाही संबंधीत घटक कार्यालयाने त्यांचे स्तरावर करावयाची आहे.

३. **सानुग्रह अनुदान :-** पोलीस कल्याण निधी नियमावलीतील नियम क्र. ९ (१)(ड) व या कार्यालयाचे क्र. पोमसं/ २८-अ/ ४९३७ / मपोकनिसं बैठक – सानु.अनुदान/४३९/२००५, दि.१६.०३.२०२२ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या वारसास संबंधित घटक कार्यालयाकडून दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या पदानुसार प्रथमत: घटक पोलीस कल्याण निधीतून सानुग्रह अनुदानाची रक्कम दिवंगताचे वारसास देण्यात यावी. त्यानंतर घटक पोलीस कल्याण निधीतून देण्यात आलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती होण्याकरीता पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्तावावर पोलीस महासंचालक कार्यालयास पाठपुरावा करुन मंजूर रक्कम प्रतिपूर्तीने संबंधित घटकाच्या पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येईल. सदर कार्यवाही संबंधित घटक कार्यालयाने त्यांच स्तरावर करावयाची आहे.

४. **अंत्यविधी अनुदान :-** पोलीस कल्याण निधी नियमावलीतील नियम क्र. ९ (१)(क) तसेच या कार्यालयाचे क्र. पोमसं/ २८-अ / ४९३७ / मपोकनिसं बैठक – सानु.अनुदान/४३९/२००५, दि.१३.०४.२०२३ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असताना मृत पावलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या पत्नी/ पतीला / जवळच्या नातलगास अंत्यविधीचा खर्च भागविण्यासाठी रू. २०,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रू. वीस हजार मात्र) इतक्या रक्कमेचे "अंत्यविधी अनुदान" देण्यात यावे. तसेच त्याच्या मूळ गावी, शव पोहचविण्यासाठी पोलीस वाहनाचा उपयोग केला असल्यास, त्या वाहनासाठी केलेल्या इंधनाचा व इतर खर्च संबंधित घटकातील मोटार परिवहन विभागाकडून करण्यात यावा. सदर कार्यवाही संबंधित घटक कार्यालयाने त्यांचे स्तरावर करावयाची आहे.

२/- (कृ.मा.प.)

५. **नुकसान भरपाई :-** नक्षलवादी, अतिरेकी, गुन्हेगार, समाजकंटक इत्यादी समाजविघातक शक्तीविरुद्ध कारवाई करतांना मृत पावलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना गृह विभाग ,शा.नि.क्र. पीडब्ल्युएफ -०१९५/ सीआर/१३१/ पोल-७, दि.१३.०३.१९९६ मधील तरतुदीनुसार रक्कम रु २,००,०००/- फक्त (अक्षरी रक्कम रु.दोन लाख फक्त) नुकसान भरपाई देय आहे. तदनंतर, शासन ,गृहविभाग यांचा दि. १६.०३.२००५ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

गृह विभाग शासन निर्णय क्र. पीडब्लुएफ- १००८/ प्र. क्र. ८/पोल – ७ दि. २९.११.२००८ मधील तरतुदीनुसार नक्षलवादी कारवाईसह, अतिरेकी कारवाई , दरोडेखोरी कारवाई, संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपात्कालीन काळात मदत करताना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई इतर सोयी सुविधा देय आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

६. **नुकसान भरपाई (गुन्हेगार, समाजकंटक इ. समाजाविघातक शक्तीविरूध्द कारवाई) :-** गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीडब्लुएफ ०८११/प्र.क्र. ४५३/ पोल- ७, दि. १२.०४.२०१२ व शासन पुरकपत्र दि. २८.०५.२०१२ मधील तरतुदीनुसार गुन्हेगार व समाजकटंक इ. समाजविघातक शक्तीविरूध्द कारवाई करताना मृत्यु पावलेल्या, कायमचे अपंगत्व आलेल्या तसेच जखमी झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्याच्या पदानुसार नुकसान भरपाईची रक्कम देय आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

७. **विशेष मदत व इतर सवलती :-** नक्षलविरोधी कारवाईत/ नक्षलवादी हल्ल्यात मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार व गृह रक्षक दलाच्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांना गृह विभाग शासन निर्णय क्र. पीडब्लुएफ – ०२०९/ प्र.क्र. १०७/ पोल –७, दि.०६.०२.२००९ मधील तरतुदीनुसार विशेष मदत व इतर सवलती मंजुर करण्यात आलेल्या आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

८. **दिवंगत अधिकारी / कर्मचारी यांच्या विधवा पत्नीस पुर्नविवाह केल्यानंतरही कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ :-** नक्षलवादी कारवाईसह, अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपात्कालीन काळात मदत करताना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत वेतन अनुज्ञेय करण्यास गृह विभाग शा. नि. क्र. पोनुभ – ०२२३/प्र.क्र.४४ /पोल –७, दि. ११.०८.२०२३ च्या तरतुदीनुसार शासनाने मान्यता दिली आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

९. **विशेष कुटुंब निवृत्तीवेतन बंद करून त्याऐवजी वेतन विषयक लाभ :-** शहीदांच्या कुटुंबियांना मिळणारे विशेष कुटुंब वेतन बंद करून त्यांना मिळणारे वेतन विषयक लाभ " २०५५-पोलीस " या मुख्य लेखा शिर्षाखाली वेतन म्हणून गृह विभाग शा. नि. क्र. पीडब्लुएफ १२११/ प्र.क्र.६२९ / पोल –७, दि. १३.०८.२०१३ मधील तरतुदीनुसार अदा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

१०. **अनुकंपा तत्वावर नियुक्ती :-** अनुकंपा नियुक्ती योजनेसंबंधी शासन निर्णय, सा.प्र.वि.,दि.२६.१०.१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णय/ शासन परिपत्रकांचे एकत्रिकरण करुन सर्व समावेशक असा सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा – १२१७/प्र.क्र.१०२/ का-८, दि. २१.०९.२०१७ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. अनुकंपा तत्वावर नियुक्त्या जलद गतीने होण्यास सहाय्यभुत म्हणुन अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपद्धती (SOP) सा.प्र.वि. क्र.अकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दि.२६.०८.२०२१ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

तदनंतर, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा – १२१७/प्र.क्र.१०२/ का-८, दि. २७.०९.२०२१ अन्वये शासकीय सेवेत असताना कर्मचा-याचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण गट-क व ड मधील शासकीय कर्मचा-यांप्रमाणेच गट- अ व ब मधील शासकीय कर्मचा-यांना लागू केले करण्यात आलेले आहे. याबाबत अशी घटना घडल्यास संबंधित घटक कार्यालयाने पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर सदरचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

३/- (कृ.मा.प.)

११. **इतर लाभ :-** शासकीय सेवेत असताना कर्मचा-याचे निधन झाल्यास त्याचे निवृत्ती वेतन, मृत्यू नि उपदान (Gratuity), गट विमा (GIS), अर्जित रजा रोखीकरण, भ.नि.नि. / परिभाषीत अंशदान योजना व डेथ लाईफ इन्शुरन्स (DLI) (फक्त GPF धारकाकरीता) इत्यादी बाबतची कार्यवाही संबंधित घटक कार्यालयाने त्यांचे स्तरावर करावयाचे आहे.

१२. **<u>वीरगती / नैसर्गिकरित्या मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांना अंतिम मानवंदना देतांना अवलंबनाच्या कार्यपद्धतीबाबत</u> :-** पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिकारी पदावर असतांना आपले अधीनस्त अधिकारी /अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी यांना कर्तव्य बजावतांना वीरगती प्राप्त झाल्यास त्यांना नियमानुसार यथोचित मानवंदना देण्यात येईल. नक्षल बंदोबस्त / कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त ,दंगल, नैसर्गिक आपत्ती निवारण यात सामील होऊन कर्तव्य बजावतांना वीरगती प्राप्त झाल्यास संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी यांना अंतिम मानवंदना देतांना खालील सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे :-

१. पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी हे नक्षल बंदोबस्त, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त दंगल,नैसर्गिक आपत्ती तसेच कर्तव्यावर असतांना वीरगती व नैसर्गिकरित्या मृत्यु आल्यास आयुक्तालय / जिल्हा **मुख्यालयाचे ठिकाणी किंवा घडलेल्या ठिकाणी** अंतिम मानवंदना देतांना घटक प्रमुख म्हणुन संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक, इतर अधिकारी उपस्थित राहुन श्रद्धांजली अर्पण करतील. जर शहिद झालेले पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी हे पोलीस आयुक्तालय / जिल्हा व्यतिरिक्त महाराष्ट्र पोलीस दलातील इतर घटकातील असतील तर त्यांचे घटक प्रमुख यांनी व्यक्तीशः उपस्थित रहावे.

२. अंतिम मानवंदना / श्रद्धांजली अर्पण करतांना **भारतीय झेंडा संहिता २००२** व राष्ट्रीय गौरव व अपमान निवारण अधिनियम १९७१ नुसार कार्यवाही करावी. (प्रत संलग्न)

३. पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांनी गृह मंत्रालय भारत सरकारचे पोलीस अनुसंधान एवं विकास ब्युरोचे, पोलीस कवायत नियम पुस्तीका मधे निर्दीष्ट केलेल्या नियमानुसार **(अध्याय XXXII अंत्येष्टी कवायतची कार्यवाही करणेत यावी (सोबत परिशिष्ट अ)**

४. झेंडासंहिता २००२ मधील ३.५८ नुसार शासकिय/ सैन्य / निमलष्करी दलाच्या सन्मानार्थ अंत्यसंस्काराच्या प्रसंगी, शवपेटी ध्वजाने झाकली जाईल आणि **ध्वजाचा भगवा भाग तावूत किंवा शवपेटीच्या पुढील बाजुस असेल, ध्वज कबरीत पुरला किंवा चितेत जाळला जाणार नाही. तो राष्ट्रीय ध्वज वीरगती प्राप्त झालेल्यांच्या कुटुंवियांना सन्मानपुर्वक सुपुर्द केला जाईल (सोबत परिशिष्ठ व व क)**

५. उपरोक्त नमुद प्रसंगी वापर करण्यात येणारा राष्ट्रीय ध्वज संहितेनुसार असावा.

तरी सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, नक्षलवादी, कारवाईसह अतिरेकी कारवाई ,दरोडेखोरी, संघंटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपात्कालीन काळात मदत करतांना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई व इतर सोयी सुविधा देणेसंदर्भात निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय / आदेश / कार्यालयीन आदेश याबाबतची एकत्रित माहिती सुलभतेकरीता संकलित करण्यात आली आहे. प्रत्येक प्रकरणी लागु असलेली योजना /अनुदान / भरपाई / सवलत यांचा सविस्तर अभ्यास करुन त्यानुसार घटक प्रमुखांनी प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. प्रत्येक प्रकरणात वरील नमुद सर्व सवलत मिळतीलच असे नाही, त्यामुळे प्रस्ताव तयार करतांना काळजीपुर्वक प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे.

दिवंगत व जखमी पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई व इतर लाभ देणेबाबतचे प्रस्ताव शासन मंजुरीकरीता सादर करतांना संबंधित शासन निर्णय व कार्यालयीन आदेशातील नियमांचे काळजीपुर्वक पालन करुन प्रस्ताव सादर करावा. तसेच सदरच्या शासन निर्णयात काही सुधारणा झाली असेल तर अशा सर्व बाबी तपासुन शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Arti Singh
Date: 25-09-2024 12:31:01

(पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मान्यतेने)

(डॉ. आरती सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,
महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक/ लोहमार्ग / रा.रा.पो.बल /प्रशिक्षण व खास पथके/
वाहतुक /फोर्स वन / विशेष कृती /महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग/
नागरी हक्क संरक्षण,म.राज्य मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)(बृहन्मुंबई वगळुन)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , म.राज्य,पुणे
अपर पोलीस महासंचालक, व संचालक पोलीस बिनतारी संदेश/ मोटार परिवहन विभाग, म.राज्य,पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य,मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उपमहानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक,विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, म.राज्य,नागपुर
संचालक ,महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक, रा.रा.पो.बल पुणे / नागपुर
सर्व पोलीस अधिक्षक (लोहमार्गसह)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.०१ ते १९
सर्व प्राचार्य ,पोलीस प्रशिक्षण विद्यालये.(रा.रा.पो.प्र. केंद्र, नानवीज दौंड सह)
प्राचार्य, यु.ओ.टी.सी. , नागपुर
उपसंचालक,गुन्हे प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रत माहितीकरीता,
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासन अधिकारी,का.क्र., १ ते ८-अ/ ३२/ ३३ / ३६ /३९.

ड्राफ्ट सर्क्युलर

पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिकारी पदावर असताना आपले अधीनस्थ अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी यांना कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झाल्यास त्यांना नियमांनुसार यथोचित मानवंदना देणे आपले शासकीय कर्तव्य आहे.

तरी, नक्षल बंदोबस्त / कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, दंगल, नैसर्गीक आपत्ती निवारण यात सामील होऊन कर्तव्य बजवाताना वीरगती प्राप्त झाल्यास संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी यांना अंतिम मानवंदना देताना खालील सूचनांचे काटेकोर पालन करावे.

१. पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी हे नक्षल बंदोबस्त, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, दंगल, नैसर्गिक आपत्ती तसेच कर्तव्यावर असताना वीरगती/शहीद व नैसर्गिकरित्या मृत्यू आल्यास आयुक्तालय/जिल्हा **मुख्यालयाचे ठिकाणी किंवा घडलेल्या ठिकाणी** अंतिम मानवंदना देताना घटक प्रमुख म्हणून संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक, इतर अधिकारी उपस्थित राहून श्रध्दांजली अर्पण करतील. जर शहिद झालेले पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी हे पोलीस आयुक्तालय / जिल्हा व्यतीरीक्त महाराष्ट्र पोलीस दलातील इतर घटकाचे असतील तर त्यांचे घटक प्रमुख यांनी देखील व्यक्तीश: उपस्थित रहावे.

२. अंतिम मानवंदना/श्रध्दांजली अर्पण करताना **भारतीय झेंडा संहिता २००२** व राष्ट्रीय गौरव व अपमान निवारण अधिनियम १९७१ नुसार कार्यवाही करावी. (सदरची प्रत www.mha.gov.in वर उपलब्ध आहे.)

३. पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी गृह मंत्रालय भारत सरकारचे पोलीस अनुसंधान एवं विकास ब्यूरोचे, **पोलीस कवायद नियम पुस्तीका** मध्ये निर्धिष्ट केलेल्या नियमानुसार **(अध्याय XXXII) अंत्येष्टी कवायदची कार्यवाही** करणेत यावी. **(सोबत परिशिष्ट अ)**

४. झेंडासंहिता २००२ मधील ३.५८ नुसार शासकिय/सैन्य/निमलष्करी दलाच्या सन्मानार्थ अंत्यसंस्काराच्या प्रसंगी, शवपेटी किंवा शवपेटी ध्वजाने झाकली जाईल आणि **ध्वजाचा भगवा भाग ताबूत किंवा शवपेटीच्या पुढील बाजूस असेल. ध्वज कबरीत पुरला किंवा चितेत जाळला जाणार नाही.** तो राष्ट्रीय ध्वज शहिदांच्या कुटूंबियांना सन्मानपूर्वक सुपूंद केला जाईल. **(सोबत परिशिष्ट ब व क)**

५. उपरोक्त नमूद प्रसंगी वापर करण्यात येणारा राष्ट्रीय ध्वज ध्वजसंहिते नुसार असावा.

६. वीरगती/शहीद झालेल्या पोलीस अधिकारी / अंमलदार / कार्यालयीन कर्मचारी यांना त्यांचे राहत्या गावी **अंत्य संस्काराच्या ठिकाणी** पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी स्वत: हजर राहून मानवंदना दयावी.